महाराष्ट्र शासन
शासकीय विधी महाविद्यालय
'ए' रोड चर्चगेट, मुंबई- ४०००२०

दूरध्वनी क्र.- ०२२-२२०४१७०७ ई- मेल- principal@glcmumbai.com

क्रमांक/शाविम/आस्था/२०२६-२७/ 8422 दिनांक- 14/10/2026

कार्यालयीन सूचना -

विषय: 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज'मध्ये सहभाग नोंदविण्याबाबत.

महाविद्यालयातील तीन वर्षीय व पाच वर्षीय विधी अभ्यासक्रमांच्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' उच्च शिक्षण, मुंबई विभाग व रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ यांच्या निर्देशानुसार महाविद्यालयामार्फत 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज' (Seva First Innovation Challenge) या उपक्रमात सहभागासाठी विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येत आहे.

सदर उपक्रमाचा उद्देश सार्वजनिक सेवा वितरणातील समस्या सोडविण्यासाठी नाविन्यपूर्ण व परिणामकारक उपाययोजना विकसित करण्यास प्रोत्साहन देणे हा आहे. या उपक्रमांतर्गत निवड झालेल्या सहभागी विद्यार्थ्यांना आपापल्या नाविन्यपूर्ण संकल्पना तज्ज्ञ, शासकीय प्रतिनिधी व उद्योग क्षेत्रातील मान्यवरांसमोर सादर करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

या उपक्रमासाठी खालील क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण संकल्पना सादर करता येतील:

१. कृषी
२. गृह, कायदा व सार्वजनिक सुव्यवस्था
३. महिला व बालविकास
४. नगरविकास
५. पर्यावरण व संवर्धन
६. आरोग्य व वैद्यकीय सेवा
७. शाश्वतता, ऊर्जा व हवामान
८. पायाभूत सुविधा व वाहतूक
९. उद्योगाभिमुख तंत्रज्ञान
१०. विज्ञान व संशोधन

महत्त्वाच्या तारखा व संपर्क तपशील:

- **अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख:** 17 ऑक्टोबर 2026
- **निवड झालेल्या अर्जांचे ऑनलाइन सादरीकरण:** 16 ते 25 नोव्हेंबर 2026
- **अधिकृत संकेतस्थळ:** https://sevainnovationchallenge.in
- **संपर्क क्रमांक:** +९१ ९०२९३ २५७४४
- **ई-मेल:** sevainnovation@mssu.ac.in

तरी, तीन वर्षीय व पाच वर्षीय विधी अभ्यासक्रमांतील इच्छुक विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करावेत व या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा.

A A Vaidya
डॉ. अस्मिता वैद्य,
प्राचार्य,
प्राचार्य
शासकीय विधी महाविद्यालय
'ओ' मार्ग, चर्चगेट, मुंबई-२०.

Scanned with OKEN Scanner

DDO CODE : 7101002209

महाराष्ट्र शासन

सहसंचालक,

उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.

शासकीय तंत्र विद्यालय आवार, महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.

email id - jdhemumbai@gmail.com. web.www.jdhemumbai.gov.in

7412
13/10/2026

जा.क्र.ससं उशि मुंवि रोजगार मेळावा /२०२६/५४९९

दिनांक - ०९.१०.२०२६

प्रति,

१. कुलसचिव,मुंबई विद्यापीठ,मुंबई.

२. कुलसचिव, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ,मुंबई.

३. कुलसचिव, डॉ. होमी भाभा स्टेट युनिर्व्हसिटी मुंबई.

४. कुलसचिव, हैद्राबाद सिंध नॅशनल विद्यापीठ, मुंबई.

५. संचालक/ प्राचार्य, **शासकीय** महाविद्यालये / संस्था, वसतिगृहे,
भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र.

६. प्राचार्य, **अशासकीय** अनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,शिक्षणशास्त्र, समाजकार्य,
तसेच शारीरिक शिक्षण महाविद्यालये, मुंबई विभाग.

विषय:- महाराष्ट्र शासनाच्या'**सेवा संकल्प अभियाना**' अंतर्गत '**सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज**' मध्ये सहभागाबाबत.

संदर्भ:- रतन टाटा, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र दि.०९.१०.२०२६.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्राच्या अवलोकनार्थ सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे.

उपरोक्त विषयाबाबत सुचित करण्यात येते की, सार्वजनिक सेवा वितरणासाठी नाविन्यपूर्ण उपाययोजनांना चालना देण्याच्या भारत सरकारच्या संकल्पनेचा एक भाग म्हणून, महाराष्ट्र शासनाकडून 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज' (Seva First Innovation Challenge) आयोजित केले जात आहे. या उपक्रमाद्वारे संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थी, संशोधक, नवोन्मेषक आणि स्टार्टअप्स यांच्यातील सर्जनशीलता व समस्या निवारण क्षमतांचा उपयोग करून घेण्याचा उद्देश आहे.

(सोबत संदर्भीय पत्र जोडण्यात आलेले आहे.)

तसेच संदर्भीय पत्रात नमूद केलेल्या सूचना व निर्देशानुसार आपल्या स्तरावरून संबंधितानां व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात यावे.

9/10/2026

T/S/Ganesh
Notify to students

(डॉ. रुपेश राऊत)
सहसंचालक
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई

माहितीस्तव प्रत,
रतन टाटा, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता महाराष्ट्र राज्य, मुंबई.००१.

Scanned with OKEN Scanner

Maharashtra State Innovation Society

Ratan Tata Maharashtra State Skills University
Skills, Employment, Entrepreneurship and Innovation Department
Government of Maharashtra
1st floor Elphinstone Technical High School, Metro Chowk, Mumbai 400001

09th October 2026

Subject: Participation in the Seva First Innovation Challenge of Seva Sankalp Abhiyan of Government of Maharashtra

Reference: 1. GR No. SanSeA-2026/Pr.Kr.155/Rupka-2 by General Administration Department dated 09.09.2026

2. GR No. SanSeA-2026 / E. No. 153690 / Prasha-4 by Skills, Employment, Entrepreneurship and Innovation Department, GoM dated 18.09.2026

Dear Principals,

The **Seva First Innovation Challenge** is being organized by Government of Maharashtra as part of the Government of India's vision to promote innovation-led solutions for public service delivery. The initiative seeks to harness the creativity and problem-solving capabilities of students, researchers, innovators and startups across Maharashtra.

The Challenge offers an attractive prize and recognition for outstanding innovations, providing participants with a unique opportunity to showcase their solutions before experts, government stakeholders, and industry leaders along with an opportunity to implement the solution with suitable Government agency.

In this regard, your esteemed College is requested to give wide publicity to the initiative and encourage maximum participation of students and innovators from all departments, incubation center, innovation cell, faculty members, researchers, and students.

Innovative solutions are invited in the following 10 specific sectors:

1. Agriculture
2. Home, Law and Public Order
3. Women and Child Development
4. Urban Development
5. Environment & Conservation
6. Health and Medical Services
7. Sustainability (Energy, Climate and Related Areas)
8. Infrastructure and Mobility (Transport)
9. Industry-Oriented Technologies
10. Science and Research

All applicants are required to register on the portal (https://sevainnovationchallenge.in/) and submit their entries through the same. Last date of submission is **17th October 2026** and online

Scanned with OKEN Scanner

presentations of selected applications is to be conducted from 16th November to 25th November 2026.

To ensure effective coordination and outreach, you are requested to nominate a nodal officer and convey via the Google Form (https://forms.gle/AxuTBuSxdhtN6Dao9). Any other institution under your supervision to also appoint a nodal point of contact for this initiative and fill the google form.) A virtual meeting will be held with nodal officers shortly.

Your prompt support in disseminating information amongst participants will be instrumental in maximizing participation.

We look forward to your wholehearted participation and active cooperation in making the Seva First Innovation Challenge a grand success.

For any other details you may contact the undersigned at +91 90293 25744 / or email at sevainnovation@mssu.ac.in

Yours faithfully, .

(Dr. Vaibhav Narawade)
Registrar

Encl.: Seva First Innovation Challenge Poster for circulation

Scanned with OKEN Scanner